JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# मराठी शाहीरीची ओळख

Marathi Sahirichi Olakh

अनिल गोवर्धन पवळ
संशोधकविद्यार्थी,
मराठी विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
महाराष्ट्र – ४११००७.

## प्रास्ताविक

मराठी कवितेला सातशे-आठशे वर्षाची दीर्घ परंपरा लाभलेली आहे. प्राचीन मराठी साहित्यातील ‘कविता` या साहित्यप्रकारात प्रामुख्याने संत कविता, पंत कविता आणि तंत अथवा शाहिरी कविता असे तीन मुख्य प्रवाह असलेले दिसतात. संत कवितेने ‘अभंग` या माध्यमातून समाजप्रबोधनाचा प्रयत्न केलेला दिसतो. तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भात संतकवितेचा विचार करताना झालेले समाजप्रबोधन हे प्रामुख्याने बहुजनसमाजाची अध्यात्मिक पातळीवरील समानता प्रस्थापित करण्यासाठी झाले ही त्याची मर्यादा मान्य करून देखील; संत कवितेतून आविष्कृत झालेले बहुजन समाजमन अभंग, गौळण, किर्तन, भारूड, भजन या वेगवेगळया माध्यमातून आविष्कृत होताना दिसते. पंडिती कवितेचा विचार करताना, या प्रकारची कविता ही पांडित्यप्रदर्शन, संस्कृताभिमान आणि उच्चवर्णीयांची मिरासदारी यांनी अंकित झालेली दिसते. तत्कालीन समाजव्यवस्थेतील उच्चवर्णीय जाणीव त्यातून अधोरेखित होताना दिसतात. रामायण, महाभारत, भागवत या ग्रंथातील दैवीकरणाचे वलय प्राप्त झालेल्या व्यक्तींच्या शौर्याचा व गुणांचा उच्चवर्णीयांच्या मनोरंजनासाठी केलेला संस्कृतप्रचूर लेखनाविष्कार म्हणजे पंडिती काव्य असे म्हणता येते. आख्यान, खंडकाव्य, महाकाव्य अशा माध्यमातून त्याचे आविष्करण झालेले दिसते. तंतकवितेबद्दल असे म्हणता येईल की, प्रारंभीच्या काळात तिच्यावर संत आणि पंतकवितेचा प्रभाव असला तरी, नंतरच्या काळात बदलत्या परिस्थितीनुरूप तिचे केंद्रस्थान व वर्ण्यविषय बदललेला दिसतो. शिवकालीन सर्वसामान्य मराठी माणसाच्या पराक्रमाचा गौरव करण्यासाठी शाहिरांनी ‘पोवाडा` या प्रकाराचा वापर केला तर स्त्रीसौंदर्याचे दर्शन घडविण्यासाठी, पेशवेकालीन विलासी जीवनाचा परिचय करून देण्यासाठी ‘लावणी` हे प्रकार हाताळले. म्हणून ‘पोवाडा` आणि ‘लावणी` ही शाहिरी काव्याची अविभाज्य अंगे असलेली दिसतात. काळानुसार बदलणाऱ्या समाजजीवनातील बदलांचे प्रतिबिंब शाहिरांनी पोवाडा व लावणी या माध्यमातून घडविलेले दिसते.

मराठी कवितेच्या परंपरेत शाहिरी कवितेने लोकभावना, प्रेमभावना व्यक्त करताना लौकिक व्यक्तीला केंद्रस्थानी ठेवून कविता केली हे शाहिरी कवितेचे इतर कवितेपेक्षा असलेले वेगळेपण अधोरेखित करता येते. लोकजीवनाशी बांधिलकी प्रस्थापित करणारा 'शाहीर' हा समाजजीवनातील चांगल्या/वाईट गोष्टींचे अवलोकन करून समाजप्रबोधन व सामाजिक परिवर्तन यासाठी महत्त्वाचे माध्यम ठरलेला दिसतो. त्याप्रमाणे विषमताधिष्ठित समाजरचना असलेल्या भारतातील विषमतेचा बळी ठरलेल्या बहुजन समाजाला अन्यायाची जाणीव करून देणारा मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन करणारा शाहीर व त्याची शाहिरी कविता वेळोवेळी बंड करताना दिसते. प्राचीन काळापासून आधुनिक युगापर्यंत निर्माण झालेल्या शाहिरी कवितेने सामाजिक चळवळी, सामाजिक प्रबोधन आणि सामाजिक परिवर्तनासाठी पार पडलेली भूमिका आणि समाजपरिवर्तनातील योगदान अधोरेखित करणे महत्त्वाचे ठरते. पारंपारिक शाहिरी काव्य आधुनिक काळात पुरोगामी विचारांचे वाहक कसे बनले याचा अभ्यास करण्यापूर्वी मराठीतील शाहिरी कवितेचा उदय, प्रेरणा आणि विकास समजून घेणे आवश्यक आहे.

उदय, प्रेरणा आणि विकास

मराठी कवितेतील शाहिरी कवितेची परंपरा तपासताना अकराव्या शतकापर्यंत मागे जाता येते. अनेक अभ्यासकांनी याविषयी मांडलेली मतमतांतरे या संदर्भात पाहता येतात. लोकजीवन हा शाहिरी काव्याचा केंद्रबिंदू झाल्यापासून समाजजीवनाचा अविभाज्य घटक असलेल्या लोकसंस्कृतीतील अनुभवांचे परिष्करण शाहिरी काव्यातून शब्दबद्ध झालेले दिसते. पुरोगामी विचारांचे वहन करण्याचे माध्यम अशी भूमिका स्वीकारल्या नंतर प्रत्येक टप्प्यावर शाहिरी कवितेत होत जाणाऱ्या बदलांचे अवलोकन केल्यास त्या त्या कालखंडातील शाहिरी कवितेचा उदय, प्रेरणा आणि विकास यांचा शोध घेता येतो. लोकजीवनातील विषय लोकभाषेतून 'पोवाडा' व 'लावणी' या माध्यमातून मांडून शाहीर समाजपरिवर्तनासाठी व प्रबोधनासाठी 'जागल्या'चे काम करताना दिसतो.

पूर्वपरंपरेचा मागोवा घेतल्याशिवाय आधुनिक काळातील पुरोगामीत्वाचे उत्तरदायित्व करणाऱ्या शाहिरी कवितेचे योग्य मूल्यमापन होऊ शकणार नाही. शाहिरी कवितेचा अभ्यास करणाऱ्या अनेक अभ्यासकांची मते यासंदर्भात विचारात घ्यावी लागतात. प्राचीन शाहीर आणि शाहिरी कविता यासंदर्भात रा. श्री. जोग म्हणतात, "यादवकालाच्या पूर्वीपासून राजस्थानसारख्या उत्तरभारतीय प्रदेशात यशोगान अथवा बिरूदगान गाणाऱ्या भाटांची परंपरा होती. हा एक प्रकारे कीर्तीकाव्याचाच नमुना होता. राजस्थानातून राजपूत कुळांबरोबर अनेक भाट महाराष्ट्रात यादवकालापूर्वी आलेले होते. त्यांचाच उत्तरकालीन आविष्कार म्हणजे शाहीर होत असेही मानता येते."[१] वरील विधानाद्वारे रा. श्री. जोग शाहिरी कवितेचा उदय महाराष्ट्रात भाटांद्वारे झाल्याचे सांगून यादवपूर्व काळापासून भाट आणि त्यांनी गायलेले यशोगान अथवा बिरूदगान याचेच रूपांतर पुढे शाहीर आणि त्याचे किर्तीकाव्य यात परावर्तित झाल्याचे मानतात. जोग शाहिरी परंपरेचा धागा अकराव्या शतकापर्यंत मागे नेताना दिसतात. त्यांचे हे मत ग्राह्य मानता येते कारण नंतरच्या संतकाळातील अनेक संतांच्या काव्यलेखनातून पवाड, यशोगान, किर्तीकाव्य इ. शब्दांचा उल्लेख आलेला आढळतो.

'शाहीर` या शब्दाची व्युत्पती पाहताना हा शब्द मराठीत 'अरबी` अथवा 'फारशी` भाषेतून आला असावा असे एक मत व्यक्त केले गेले. शाहीर म्हणजे कवी या अर्थाने डॉ. मनोहर जाधव आणि प्रा. पृथ्वीराज तौर यासंदर्भात माहिती देताना म्हणतात, "शाहीर हा शब्द अरबी 'शाइर` अथवा फारशी 'शायर` या शब्दापासून आलेला दिसतो. या शब्दाचा अर्थ कवी असा होय. मराठी काव्यपरंपरेमध्ये 'विशिष्ट पद्धतीचे लेखन करणारे कवी` म्हणून या शब्दाचा वापर होताना दिसतो."[२] वरील विधानातील विशिष्ट पद्धतीचे लेखन करणारे कवी या अर्थाने पराक्रम आणि शौर्य गाजविणाऱ्या विशिष्ट व्यक्तीच्या या गुणांचा आदर्श सामान्य माणसांसमोर प्रतिपादन करून त्यांना अशा प्रकारच्या कार्यासाठी उद्युक्त करणे आणि त्याचबरोबर मनोरंजनातून उद्बोधन करणे हा विशिष्ट हेतू त्यातून दिसून येतो. हीच शाहिरी काव्याची प्रेरणा म्हणून संबोधता येते.

मराठी शाहिरी कवितेला अशी पूर्वपरंपरा असली तरी शाहिरी कवितेचा विकास प्रामुख्याने सोळाव्या शतकात झालेला दिसतो. छत्रपती शिवाजी महाराजांसारखा लोकोत्तर राजा लाभल्याने त्याच्या पराक्रमाचे, गुणांचे वर्णन हा तत्कालीन शाहिरांचा वर्ण्यविषय झाला. देवदेवतांच्या किंवा अलौकिक व्यक्तिमत्त्वाचे गुणवर्णन गाणाऱ्या गोंधळी समाजातून त्यातील कलावंतांकडून 'पोवाडा` या प्रकारचे काव्यगायन शिवकालात झालेले दिसते. लौकिक जीवनात अलौकिक पराक्रम गाजविणाऱ्या व्यक्तीच्या पराक्रमाचे वर्णन हा पोवाड्याचा मुख्य विषय झाला हे शिवकालीन शाहिरी कवितेचे वैशिष्ट्य म्हणता येते. कारण शिवपूर्वकालात कोणतीही लौकिक व्यक्ती पवाड्याच्या केंद्रस्थानी आलेली निदर्शनास येत नाही. यादवपूर्वकालीन भाटांची जागा शिवकालात गोंधळ्यांनी घेतलेली दिसते. अज्ञानदास आणि तुळशीदास या शिवकालीन गोंधळी समाजातील शाहिरांनी बहुजनसमाजाला शिवरायांचे स्वप्न असलेल्या स्वराज्य उभारणीसाठी खडबडून जागे केले आणि राजांच्या पराक्रमी वृत्तीचे कवितेतून (पोवाड्यातून) दर्शन घडवून स्वराज्यस्थापनेच्या कार्यात पाठिंबा देण्यास अठरापगड जातीतील लोकांना उद्युक्त केले. या जनतेच्या पाठिंब्यामुळे शिवाजी महाराजांनी परकिय यवनी सत्तेच्या पारतंत्र्यातून स्वदेशाची मुक्तता केली. हा पाठिंबा राजांना मिळाला तो शाहिरांनी पेटवलेल्या, चेतवलेल्या समाजामनामुळे याची नोंद येथे घ्यावीशी वाटते. शाहिरांनी पारतंत्र्याविषयी चीड निर्माण करून परकिय सत्तेविरुद्ध समाजमन चेतविण्यासाठी वापरलेले 'पवाडा` हे एक प्रभावी माध्यम झाल्याचे दिसते. शाहिरांनी अध्यात्म, भक्ती, पांडित्य या कुंपणात अडकलेल्या मराठी कवितेला मोकळे केले. तसेच मराठी कवितेभोवती वलयांकित झालेल्या अलौकिक, दैवी व्यक्तींना आणि विषयांना छेद दिला आणि सामान्य माणसाचे जगणे आणि जीवनदर्शन मांडून मराठी कविता लोकजीवनाशी जोडण्याचे मौलिक कार्य केले.

आधुनिक मराठी शाहिरी कवितेची पूर्वपरंपरा तपासताना त्यात अनेक प्रवाह दिसून येतात. शिवकालीन परंपरा, शाहूकालीन परंपरा, पेशवेकालीन शाहिरी परंपरा, अव्वल इंग्रजी काळातील परंपरा, फुले-आंबेडकरी शाहिरी परंपरा आणि मार्क्सवादी शाहिरी परंपरा हे ठळक प्रवाह दिसतात. काळानुसार या परंपरा कशा विकसित होत गेल्या यामागील प्रेरणा कोणत्या हे त्या त्या काळाच्या संदर्भात तपासणे महत्त्वाचे ठरते.

शाहीर अज्ञानदास, शाहीर तुळशीदास, शाहीर यमाजी आणि शाहीर अज्ञान यमाजी हे शिवकाळातील प्रमुख शाहीर आहेत. छत्रपती शाहूंच्या काळात शा. बाबू सवाई रामा, शा. मल्लारदास, शा. त्रिंबक माळी, शा. दादू, शा. फिरंगू नाना, शैव

मयूर हे शाहीर दिसतात. पेशवाईतील प्रमुख शाहिरांमध्ये अनंतफंदी, परशराम, होनाजी बाळा, रामजोशी, प्रभाकर, सगनभाऊ, गंगू हैबती, लक्ष्मण, बापू गुणिजन या शाहिरांचा समावेश होतो. कवी विनायक, शंकरराव निकम, वि. दा. सावरकर, ग. दि. माडगूळकर या शाहिरांनी ब्रिटिश राजवटीत इंग्रजी साम्राज्यवादाच्या विरोधात माध्यम म्हणून शाहिरी कवितेतील 'पोवाडा' या प्रकाराचा वापर केला. महात्मा जोतीराव फुले, किसन फागुजी बनसोड यांनी सामाजिक समतेचा पुरस्कार करणारी शाहिरी कविता लिहिली. महात्मा फुल्यांच्या सामाजिक समतेचा पुरस्कार करणारे 'सत्यशोधकी जलसे' हे त्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या चळवळीतून उदयास आलेले दिसतात. सत्यशोधकी जलशांची प्रेरणा घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार करणारे 'आंबेडकरी जलसे' हे तत्कालीन समाजप्रबोधनाचे प्रसारमाध्यम ठरलेले दिसते. शाहीर अण्णा भाऊ साठे, शाहीर अमरशेख, शाहीर गव्हाणकर या शाहिरी त्रयीने 'लाल बावटा' कलापथक स्थापून जलशांची परंपरा पुढे चालू ठेवली. वर्गवादाला विरोध ही त्यामागील प्रमुख भूमिका दिसते. मार्क्सवाद ही यांच्या शाहिरी कवितेमागील प्रमुख प्रेरणा दिसते. मराठी शाहिरी कवितेचा विकास हा या क्रमाने झालेला दिसतो.

महात्मा फुले यांनी १९६९ साली लिहिलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पोवाड्यातून आधुनिक परिवर्तनशील शाहिरी कवितेचा प्रारंभ झालेला दिसते. महात्मा फुल्यांपासून ते स्वातंत्र्यप्राप्तीच्या काळापर्यंत या पुरोगामी शाहिरीचा विकास झालेला दिसतो. स्वातंत्र्योत्तर काळातील अनेक शाहिरांनी ही परंपरा पुढे चालू ठेवली. पुरोगामी मराठी शाहिरी कवितेत काळानुसार बदल होत गेलेले दिसतात. त्याप्रमाणे त्याच्या प्रसार माध्यमात देखील परिवर्तन झालेले दिसते. पोवाडा, लावणी या शाहिरी कवितेतील दोन प्रमुख प्रकारांबरोबरच गण, गवळण, छक्कड, फटका, लोकनाट्य या माध्यमांचा देखील प्रभावी वापर झालेला दिसतो.

**प्राचीन शाहिरी परंपरा**

पोवाड्याची परंपरा तपासताना अकराव्या शतकापर्यंत मागे जावे लागते. महिकावतीची बखर या ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेत वि. का. राजवाडे म्हणतात, "सर्वात जुन्या पोवाड्याचा उल्लेख 'महिकावतीच्या बखरीत आढळतो. बिंब राजाचा पुत्र केशवदेव याने मोठ्या ऐश्वर्याने बारा वर्षे राज्य केले. त्याने राजपितामह म्हणजे आसपासच्या सर्व लहान-सहान संस्थानिकांचा आजा ही परवी धारण केली व त्या अर्थाचे बडेजावीचे गद्यपद्य पोवाडे रचिले."[३] राजवाडे यांनी केलेल्या उल्लेखावरुन अकराव्या शतकातदेखील पोवाडे गायनाची परंपरा होती असे दिसून येते. त्यामागील प्रेरणा राजघराण्यातील पराक्रम गाजविलेल्या व्यक्तींच्या पराक्रमाचे वर्णन करणे ही प्रामुख्याने दिसते. "केशवदेवच्या काळचे म्हणजे शके ११०० -१२०० च्या सुमारास पोवाडे पद्य असून गद्य ही आहेत."[४] असा उल्लेख राजवाडे प्रस्तावनेत करतात यावरून पोवाड्याच्या परंपरेची आणि स्वरूपाची कल्पना येते.

**समारोप**

अशाप्रकारे शाहिरी कवितेचा विस्तृत आढावा घेतल्यानंतर शाहिरी कवितेचे बदलत जाणारे स्वरूप समोर येते. प्राचीन मराठी शाहिरी कविता ही राजाश्रित होती. राजकीय आश्रय लाभल्याने तिचे स्वरूप प्रामुख्याने राज्यकर्त्यांची स्तुती, पराक्रम, त्यांच्या राजकीय, सामाजिक, वैयक्तिकजीवनाचे वर्णन असे दिसते.

## संदर्भ टिपा


1. जोग रा. श्री. (संपा.) ‘मराठी वाङ्मयाचा इतिहास`, खंड तिसरा महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे. प्र.आ. १९७३ , पृ.४०६
2. जाधव मनोहर, तौर पृथ्वीराज (संपा.) ‘मराठी शाहिरी कविता`, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद. प्र.आ. २००९ , पृ. १२
3. राजवाडे वि. का. ‘महिकावतीची बखर` प्रस्तावना, पृ.१९
4. तत्रैव, पृ.३७